3i Infotech
Innovation • Insight • Integrity

३ आय इन्फोटेक लिमिटेड
कॉर्पोरेट आयडेंटिफिकेशन नंबर (सीआयएन):एल६७१२०एमएच१९९३पीएलसी०७४४११
नोंदणीकृत कार्यालय : टॉवर # ५, ३ रा ते ६ वा मजला, इंटरनॅशनल इन्फोटेक पार्क,
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३, भारत
दूरध्वनी : (९१-२२) ७१२३ ८००० **फॅक्स क्र. :** (९१-२२) ७१२३८०९८
ई-मेल : investors@3i-infotech.com **संकेतस्थळ :**www.3i-infotech.com

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन २९(१)(ए) सहवाचता रेग्युलेशन ४७(१)(ए) अन्वये, याद्वारे सूचना देण्यात येते आहे की, ३० एप्रिल, २०१७ रोजी इतर बाबी व संपलेली तिमाही आणि वर्ष ३१ मार्च, २०१७ साठी लेखापरिक्षित वित्तीय निकाल विचारात घेऊन संमत करण्यासाठी, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा घेण्यात येईल.

ही सूचना कंपनीचे संकेतस्थळ www.3i-infotech.com येथे सुद्धा उपलब्ध आहे व कंपनीचे शेअर्स जिथे सूचीबद्ध आहेत त्या स्टॉक एक्स्चेंजेसच्या संकेतस्थळावरसुद्धा www.bseindia.com आणि www.nseindia.com येथे उपलब्ध आहेत.

तारीख : ३ एप्रिल, २०१७
स्थळ : नवी मुंबई

३ आय इन्फोटेक लिमिटेड साठी
सही/-
राजीव लिमये
कंपनी सचिव

भद्रेश ट्रेडिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

फॉर्म क्र. एनसीएलटी. ३ ए
याचिकेचे तपशील सांगणारी जाहिरात
(नियम ३५)
कंपनी याचिका क्र. १७६२ सन २०१७

याचिकेची सूचना

मॅजेस्टिक शॉपिंग सेंटर, २ रा मजला, १४४, जे. एस. एस. मार्ग, गिरगाव, मुंबई-४०० ००४, येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली भद्रेश ट्रेडिंग कॉर्पोरेशन लिमिटेड, एक अर्जदार यांची, वित्तीय वर्ष २०१४-१५ आणि २०१५-१६ च्या वित्तीय विवरणपत्रे व मंडळाचा अहवाल यांच्या ऐच्छिक फेरतपासणीची, कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १३१ अन्वये याचिका भद्रेश ट्रेडिंग कॉर्पोरेशन लिमिटेड च्यावतीने **मकरंद एम. जोशी अॅन्ड कं., कार्यरत कंपनी सचिव** यांच्या भागीदार **कु. कुमुदिनी परांजपे** यांनी त्या याचिकेचे प्रतिनिधित्व, **शुक्रवार, १० फेब्रुवारी, २०१७ रोजी** केले, आणि सदर याचिका राष्ट्रीय विधी कंपनी न्यायाधिकरणाच्या मुंबई न्यायपीठासमोर सुनावणीसाठी **मंगळवार, २५ एप्रिल, २०१७ रोजी,** पक्की करण्यात आली आहे. कोणीही व्यक्ती, जिला सदर याचिकेला पाठिंबा अथवा विरोध दर्शवायचा असेल, तर त्याने किंवा त्याच्या वकिलांनी सही केलेली, त्याच्या हेतूची सूचना त्याच्या नाव व पत्त्यासह, त्याने अधिकृत प्रतिनिधीला अशा बेताने पाठवावी की ती अधिकृत प्रतिनिधीला उशिरात उशिरा, याचिकेच्या सुनावणीसाठी पक्क्या केलेल्या तारखेच्या दोन दिवस आधी मिळेल जर त्याला याचिकेला विरोध करायचा असेल, तर विरोधाची कारणे किंवा त्याच्या प्रतिज्ञालेखाची प्रत, अशा सूचनेबरोबर सादर केली जावी. कोणाही व्यक्तीला सदर याचिकेची प्रत हवी असेल, तर ती त्यासाठी विहित आकार भरल्यावर, निम्नस्वाक्षरीकाराकडून दिली जाईल.

तारीख : ४ एप्रिल, २०१७

सही/-
कंपनी सचिव कुमुदिनी परांजपे, मकरंद एम.जोशी आणि कं. च्या भागीदार
(कार्यरत कंपनी सचिव) (अधिकृत प्रतिनिधी)
प्रॅक्टिस प्रमाणपत्र क्रमांक - ६६९०
सभासदत्व क्रमांक - ६६६७
पत्ता : एक्स्टसी, ८०३/८०४, ९ वा मजला, सिटी ऑफ जॉय,
जेएसडी रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०० ०८०

जाहीर सूचना

माझे अशील यांनी खालील नमूद परिशिष्टातील संबंधित वास्तू, जी सर्व प्रकारच्या बोजामुक्त आहे, ती श्री. अब्दुल हमीद सिद्दीक सुलेमान यांच्याकडून ताब्यात घेण्याबाबत वाटाघाटी केल्या व त्यास मान्य झाले असून त्यांनी त्याप्रमाणे श्री. अब्दुल हमीद सिद्दीक सुलेमान यांच्या सदर वास्तूबाबतच्या नामाधिकाराबाबत तपासणी करणेबाबत आम्हाला कळविले आहे.

कुणाही व्यक्ती/व्यक्तींना सदर वास्तू किंवा त्याच्या कोणत्याही भाग याबाबत हक्क, नामाधिकार, लाभ, हितसंबंध, भाग, दावा किंवा मागणी जसे वाटप, विक्री, हस्तांतर, अदलाबदल, भाडेपट्टा, पोटकुळ, अभिहस्तांकन, गहाण, भार, धारणाधिकार, वारसा, इच्छापत्रित दान, उत्तराधिकार, बक्षीस, देखभाल, सुविधाधिकार, न्यास, भाडेकरू, पोट-भाडेकरू, लिव्ह अॅन्ड लायसन्स, काळजीवाहू तत्त्वावर, वहिवाट, ताबा, कोणत्याही न्यायालयाचा आदेश, करारनामा, विकासविषयक हक्क, भागीदारी, कोणतीही लिखित/व्यवस्था किंवा कोणत्याही स्वरुपाचा दावा असल्यास निम्नस्वाक्षरीकारांना सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यासह कळवावे, अन्यथा हक्क, नामाधिकार, लाभ, हितसंबंध, भाग, दावा/ किंवा मागणी असल्यास ती सोडून दिली जाईल व असा कोणताही दावा अस्तित्वात राहणार नाही व माझे अशील व्यवहार पूर्ण करतील.

वरील उल्लेखित परिशिष्ट

समुंदर पॉईंट, अॅनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८ स्थित सीएस नं. ५/१ आणि सीएस नं. ६/१ धारक, वरळी विभाग, मोजमापित एकूण ८९८.८४ चौ.मी. जमीन व त्यावर बांधण्यात आलेल्या बिल्डिंग यावर १/३ (एक तृतियांश) इतके विभक्त हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध याबरोबरच समुंदर पॉईंट, अॅनी बेझंट रोडलगत, वरळी, मुंबई-४०००१८ येथील सीएस नं. ५/१, धारक वरळी विभाग यावरील वरील उल्लेखित बिल्डिंग, जिचे नाव समुंदर महल आहे, या बिल्डिंगच्या तिसऱ्या मजल्यावरील निवासी फ्लॅट मोजमापित सुमारे २५५३.४७ चौ.फूट (२३७.३१ चौ.मी.) कार्पेट एरिया आणि समुंदर पॉईंट, अॅनी बेझंट रोडलगत, वरळी, मुंबई-४०००८ स्थित जमिनीवरील सी.एस. नं. ६/१ धारक, वरळी विभाग यावरील बंद गॅरेज नं. ३ गॅरेजच्या बांधकामातील मोजमापित सुमारे २२८.३४ चौ.फूट (२१.२१ चौ.मी.) कार्पेट एरिया यावरील सर्व हक्क, नामाधिकार, हितसंबंध.

मुंबई,
दिनांक : ४ एप्रिल, २०१७.

सईद मुलाणी
अॅडव्होकेट,
मुलाणी अॅन्ड कं.
प्रॉस्पेक्ट चेंबर्स अॅनेक्स,
पिठा स्ट्रीट
पी. एम. रोडलगत,
फोर्ट, मुंबई-४००००१.

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण-१

(भारत सरकार, वित्त मंत्रालय)
५ वा मजला, सिंदिया हाऊस, एल अॅन्ड टी हाऊससमोर,
नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ००१.
ओ. ए. १६ सन २०१७ **परि. क्र. १४**

पंजाब नॅशनल बँक **...अर्जदार**
विरुद्ध
मे. आराम ट्रेडिंग प्रा. लि. आणि अन्य **...प्रतिवादी**

समन्स

ज्याअर्थी, अर्जदारांनी चालू आणि भविष्यातील व्याज आणि इतर अनुतोषांसह एकत्रित त्यातील नमूद रकमेच्या वसुलीकरिता तुमच्या विरोधात रिकव्हरी ऑफ डेबट्स् ड्यू टू बँक्स अॅण्ड फायनान्शियल इन्स्टिट्युशन्स अॅक्ट, १९९३ च्या कलम १९ अन्वये अर्ज स्थापित केला आहे. तुम्हाला याद्वारे दाव्याला उत्तर देण्यासाठी **०५/०५/२०१७** रोजी **दु. १२.००** वा. किंवा त्यानंतर त्वरित न्यायाधिकरणाच्या सोयीनुसार सदर न्यायाधिकरणासमोर हजर राहणे आणि तुमचे लेखी विवरणपत्र दाखल करण्यासाठी समन्स बजावण्यात येत आहे.

२. न्यायाधिकरणासमक्ष तुमच्या उपस्थितीत तुम्ही जोडपत्र प्राप्त करण्याचे निर्देश आहेत.

३. तुम्ही जर कोणतेही दस्तावेज दाखल करू इच्छित असल्यास, तुम्ही लेखी विवरणपत्रासह सूचीसह दाखल करू शकता.

४. तुम्ही व्यक्तिश: योग्य माहिती असलेल्या वकिला/प्लीडरद्वारे न्यायाधिकरणासमोर हजर रहाल तेव्हा नोंदणीकृत पत्ता आणि हजर राहण्याचे पत्र दाखल करणे आवश्यक आहे.

५. सूचना घ्यावी की, येथे वरील नमूद दिवशी तुम्ही हजर राहण्यास कसूरवार ठरल्यास, तुमच्या अनुपस्थितीत अर्जाची सुनावणी होईल आणि निर्णय केला जाईल.

माझ्या हस्ते आणि सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने **०१/०४/२०१७** रोजी दिले.

(ए. मुरली)
प्रभारी प्रबंधक
मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण-१

प्रति,
प्रति. १ : मे. आराम ट्रेडिंग प्रा. लि.
येथे : ए-३४६, अन्टॉप हिल वेअरहाऊसिंग कॉम्प्लेक्स, विद्यालंकार कॉलेज मार्ग, वडाळा (पू), मुंबई - ४०० ०३७.
येथेही - २४६, बी विंग, दुसरा मजला, परेश कॉम्प्लेक्स, जैन मंदिरासमोर, गाव-कालेर, ता.- भिवंडी, जि. ठाणे - ४२१ ३०२.
प्रति. ३ : श्री. शैलेश रमेश धवर,
येथे : फ्लॅट क्र. ६१-ई, कुर्ला कामगार सीएचएसएल, सीएसटी रोड, कुर्ला बस डेपोजवळ, कुर्ला (पू), मुंबई - ४०० ०२४.
प्रति. ४ : श्रीम. ज्योत्स्ना डी. जोशी,
येथे : प्लॉट क्र. १८६, (सीटीएस क्र. १३३), पाचगणी, ता.: महाबळेश्वर, जि. सातारा, महाराष्ट्र.
प्रति. ५ : श्री. धर्मेन जोशी, येथे : प्लॉट क्र. १८६, (सीटीएस क्र. १३३), पाचगणी, ता.: महाबळेश्वर, जि. सातारा, महाराष्ट्र.
प्रति. ६ : श्रीम. नयनाबेन कांतिलाल जोशी,
येथे : फ्लॅट क्र. सी-१४, संभव दर्शन पुरुषोत्तम पार्क सीएचएसएल, कार्टर रोड क्र. ४, गोयल प्लाझा शॉपिंग सेंटरजवळ, बोरिवली (पू), मुंबई - ४०० ०६६.
प्रति. ७ : मे. प्रीत मर्कंटाईल प्रा. लि.
येथे : २, जॉन रॉबर्ट्स कंपाऊंड, शिवडी फोर्ट रोड, शिवडी (पू), मुंबई - ४०० ०१५.

जाहीर सूचना

टेलिकम्युनिकेशन (ब्रॉडकास्टिंग अँड केबल सर्व्हिसेस) इंटरकनेक्शन रेग्युलेशन्स २००४ (सुधारित) चे कलम ४.३ आणि टेलिकम्युनिकेशन (ब्रॉडकास्टिंग अँड केबल सर्व्हिसेस) इंटरकनेक्शन (डिजिटल अॅड्रेसेबल केबल टेलिव्हिजन सिस्टीम्स) रेग्युलेशन्स २०१२ (सुधारित) चे कलम ६.५ नुसार माँ मूव्हीज एचडी चॅनेलच्या दर्शकांना कळविण्यात येत आहे की, स्टार इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एसआयपीएल) यांनी एप्रिल ३०, २०१७ (मध्यरात्र ००.०० वा.) माँ मूव्हीज एचडी चॅनेलचे संपर्क होत असलेल्या सर्व ठिकाणी (डायरेक्ट टू होम, हेडएन्ड इन दि स्काय, इंटरनेट प्रोटोकॉल टेलिव्हिजन अँड डिजिटल अॅड्रेसेबल केबल टेलिव्हिजन सिस्टीम्स)पुनर्प्रक्षेपण खंडित केले आहे.

एसआयपीएलशी संलग्न संपर्क होत असलेल्या सर्व ठिकाणी माँ मूव्हीज एचडी चॅनेल्सचे सिग्नल खंडित करण्यात येतील आणि दर्शकांसाठी वरील दिनांकापासून या माध्यमातून उपलब्ध होणार नाही.

द्वारा वितरित:
स्टार इंडिया प्रा.लि.
स्टार हाऊस, उर्मी इस्टेट, ९५, गणपतराव कदम मार्ग,
लोअर परेल, मुंबई-४०० ०१३

KSB

केएसबी पंप्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: १२६, मेकर चेंबर्स III, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१
सीआयएन: एल२९१२०एमएच१९६०पीएलसी ०११६३५
दू. क्र. ०२२ ६६५८८७८७ फॅक्स क्र.: ०२२ ६६५८८७८८, www.ksbindia.co.in

सभासदांना सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीची ५७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') बुधवार, २६ एप्रिल, २०१७ रोजी दु. ३.०० वा. बजाज भवन, तळ मजला (कमलनयन बजाज हॉल), २२६, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१ येथे एजीएमच्या निमंत्रणाच्या दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या सूचनेत मांडलेले कामकाज करण्यासाठी होईल.

एजीएमची सूचना असलेल्या वार्षिक अहवाल २०१६ ची इलेक्ट्रॉनिक प्रत कंपनी किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट(स) कडे ई-मेल आयडीज नोंदवलेल्या सर्व सभासदांना पाठवली आहे आणि अन्य सर्व सभासदांना संमत माध्यमातून त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर प्रत्यक्ष प्रत पाठवली आहे.

कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम १०८ सहवाचता त्याचे नियम आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४४ ला अनुसरून कंपनी तिच्या सभासदांना सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेड (''सीडीएसएल'') इलेक्ट्रॉनिक व्होटिंग सिस्टीममार्फत ५७ व्या एजीएमच्या सूचनेत मांडलेल्या सर्व ठरावांवर रिमोट ई-व्होटिंग सेवेमार्फत इलेक्ट्रॉनिक पध्दतीने त्यांचे मत देण्याची सुविधा आणि ज्यांच्याकडे रिमोट ई-व्होटिंग सेवा मिळू शकत नाही त्या सभासदांना एक मत पत्रिकेमार्फत मतदान करण्याची सुविधा पुरवत आहे. सूचनेत मांडलेले कामकाज, इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाद्वारे करता येईल. अधिनियम आणि नियमांच्या तरतुदींनुसारचे तपशील खाली दिले आहेत.

१. १ एप्रिल, २०१७ रोजी कंपनीने एजीएमच्या सूचनेसह एकत्रितपणे वार्षिक अहवाल सभासदांना एकतर ई-मेलने किंवा प्रत्यक्ष पध्दतीने पाठवणे पूर्ण केले आहे.
२. रिमोट ई-व्होटिंग कालावधी रविवार, २३ एप्रिल, २०१७ रोजी (स. ९.०० वा. प्रमाणवेळ) सुरू होईल आणि मंगळवार, २५ एप्रिल, २०१७ रोजी (सं. ५.०० वा. प्रमाणवेळ) संपेल, मंगळवार, २५ एप्रिल, २०१७ रोजी सं. ५.०० नंतर मतदानासाठी रिमोट ई-व्होटिंग मॉड्युल सीडीएसएलकडून निष्क्रीय केले जाईल आणि सदर वेळेनंतर रिमोट ई-व्होटिंग करू दिले जाणार नाही.
३. ५७ व्या एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कोणतीही व्यक्ती कंपनीचे शेअर्स संपादित करून कंपनीची सभासद झाली असल्यास, त्यांनी मतदान प्रक्रियेसाठी सूचनेच्या टीपांचा संदर्भ घ्यावा.
४. सभासदांचे मताधिकार, गुरुवार, २० एप्रिल, २०१७ ह्या कट-ऑफ डेट रोजीस कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलातील त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणात असतील.
५. केवळ कट-ऑफ डेट रोजीस सभासदांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीज ठेवत असलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत नाव नोंदवलेली व्यक्तीच रिमोट ई-व्होटिंग सुविधा वापरण्यास, मतपत्रिकेद्वारे तसेच एजीएममध्ये मतदान करण्यास हक्कदार असेल.
६. एजीएममध्ये मतदान: ज्या सभासदांनी एकतर रिमोट ई-व्होटिंगद्वारे किंवा मतपत्रिकेद्वारे त्यांचे मत दिले नसेल ते एजीएममध्ये त्यांचे मताधिकार वापरू शकतात. एजीएमच्या ठिकाणी ह्याबाबत कंपनीकडून आवश्यक व्यवस्था केली जाईल.
७. रिमोट ई-व्होटिंगद्वारे किंवा मतपत्रिकेद्वारे मत देण्याचे अधिकार वापरल्यानंतरही सभासद एजीएममध्ये सहभागी होऊ शकतात परंतु, त्यांना सभेत पुन्हा मत देण्याचा हक्क नसेल.
८. अन्य बाबींसह ५७ व्या एजीएमची सूचना असलेला वार्षिक अहवाल २०१६ कंपनीची वेबसाईट www.ksbindia.co.in वर आणि सीडीएसएलची वेबसाईट www.evotingindia.com वर देखील उपलब्ध आहे.
९. रिमोट ई-व्होटिंगशी संबंधित कोणत्याही चौकशा/तक्रारींच्या बाबतीत, सभासदांनी www.evotingindia.com येथे हेल्प सेक्शनखाली उपलब्ध असलेल्या फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (''एफएक्युज'') व ई-व्होटिंग मॅन्युअल पाहावे किंवा सीडीएसएलशी खालील टोल फ्री क्र. १८००२००५५३३ येथे संपर्क साधावा किंवा श्री. राकेश दळवी, डेप्युटी मॅनेजर, सीडीएसएल, फिरोझ जीजीभॉय टॉवर्स, १६ वा मजला, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४००००१. ई-मेल आयडी: helpdesk.evoting@cdslindia.com येथे संपर्क साधावा.

मुंबई
३ एप्रिल, २०१७

नरसिम्हन आर.
कंपनी सेक्रेटरी

कार्पोरेशन बँक Corporation Bank
(A Premier Public Sector Bank)

मंगलोर-पूंजा-आर्केड शाखा (१२९)
१ ला मजला, पूंजा आर्केड बिल्डिंग, के. एस. राव रोड, हमपंकट्टा, पी. बी. क्र. २२४, मंगलोर - ५७५ ००१

सिक्युरीटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या कलम १३ (३) सहवाचता कलम १३ (२) अन्वये सूचना

बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी नमूद केलेल्या खालील तपशिलानुसार सदर सूचना निर्गमनापासून ६० दिवसांत थकबाकीच्या मागणीसाठी खालील नमूद कर्जदार / हमीदार यांना सरफैसी अॅक्ट, २००२ च्या कलम १३(२) च्या अनुपालनामध्ये मागणी सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर सर्व सूचना न पोहोचता परत आल्या. त्यामुळे खालील कर्जदार / हमीदार यांच्या माहितीकरिता केलेले सूचनेचे प्रकाशन आहे.

कर्जदार आणि हमीदारांची नावे आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन	मागणी सूचनेची तारीख	सूचनेनुसार बँकेची थकीत रक्कम
१. **मे. असोसिएट लुंबर्स प्रा. लि.** असोसिएट हाऊस, ८५-ए, व्हिक्टोरिया रोड, मुस्तफा बझार, मुंबई-४०००१०. १(ए) **श्री. मनोहर एस. अगिचा** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे. १(बी) **श्री. मोहम्मद फारूक एस. दरवेश** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे. १(सी) **श्री. इब्राहिम एम. दरवेश** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे. १(डी) **श्री. श्रीचंद एस. अगिचा** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे. १(इ) **सौ. शबाना उस्मान एस. दरवेश** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे. १(एफ) **श्री. अशोक एस. अगिचा यांचे कायदेशीर वारस** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे. १(जी) **श्री. सतिश एस. अगिचा** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे. २. **हमीदार** १(ए) **श्री. मनोहर एस. अगिचा** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे. १(बी) **श्री. मोहम्मद फारूक एस. दरवेश** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे. १(सी) **श्री. इब्राहिम एम. दरवेश** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे. १(डी) **श्री. श्रीचंद एस. अगिचा** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे. १(इ) **सौ. शबाना उस्मान एस. दरवेश** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे. १(एफ) **श्री. अशोक एस. अगिचा यांचे कायदेशीर वारस** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे. १(जी) **श्री. सतिश एस. अगिचा** द्वारे क्र. १ वरीलप्रमाणे.	दि. १६.०३.२०१६ रोजीच्या मूल्यांकन अहवालाप्रमाणे रु. ०.७६ कोटी किंमत असलेल्या मे. असोसिएटेड लुंबर्स प्रा. लि. कंपनीच्या नावे असलेला निवासी फ्लॅट क्र. १६०२, १६ वा मजला, वेस्ट विंड अपार्टमेंट, कलेक्टर्स बंगलो, मंगलोर (डी.क्र. १५-४-१९९/२(६८). शर्मा रिसॉर्ट कॉम्प्लेक्स, अंजर - गलपद्दार रोड, गलपद्दार, गुजरात.	०८.०३.२०१७	रु. ६८,४४,७०,०६०.३५ + व्याज आणि इतर आकार

ज्याअर्थी वरील नमूदनुसार कर्जदार आणि हमीदार यांच्या विनंतीवरुन **कॉर्पोरेशन बँक, मंगलोर-पूंजा-आर्केड शाखा** यांनी पत सुविधा मंजूर केल्या. वरील खाते मुद्दल आणि त्यावरील व्याजाचे प्रदान न केल्यामुळे एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे आणि **दि सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२** च्या कलम १३ पोटकलम (२) अन्वये दिलेल्या पत्त्यावर आणि वरील नमूद तारखेस कर्जदार आणि हमीदार यांना मागणी सूचना निर्गमित केली, परंतु ती न बजावता परत आली. ज्याअर्थी बँकेची वरील नमूद थकबाकी कर्जदारांच्या नावासमोर नमूद केलेल्या तारणांद्वारे सुरक्षित आहे, वरील सदर मागणी ही सदर अधिनियमाच्या कलम १३ पोटकलम (२) अन्वये कर्जदार आणि हमीदार यांना याद्वारे करण्यात येत आहे, वरील सर्व प्रेषितींना सदर सूचना तारखेपासून ६० दिवसात तारखेपर्यंत व्याज अधिक त्यांच्या नावासमोर नमूद केलेली बँकेची थकबाकी चुकती करण्यासाठी सदर सूचना देण्यात येत आहे, कसूरवार ठरल्यास बँक सरफैसी अॅक्ट, २००२ च्या कलम १३ पोटकलम (४) अन्वये पावले उचलण्यासाठी पुढील कार्यवाही करेल. वरील सर्व कर्जदार आणि हमीदार यांना बँकेच्या पूर्व मंजुरीशिवाय बँकेकडे गहाण असलेल्या वरील नमूद मिळकतीच्या कोणत्याही प्रकारच्या हस्तांतरणासाठी विक्री, हस्तांतर न करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. कर्जदार/हमीदार यांना कोणत्याही कामकाजाच्या दिवशी निम्नस्वाक्षरीकारांकडून कलम १३(२) अन्वये निर्गमित **मूळ सूचना** घेऊन जाण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

कॉर्पोरेशन बँककरिता
सही/-
प्राधिकृत अधिकारी

दिनांक : ०८.०३.२०१७
ठिकाण : मुंबई

जाहीर सूचना

जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही येथे खालील परिशिष्टात सविस्तर वर्णन लिहिलेल्या मिळकतीच्या संबंधातील कांदिवली रिद्धी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., नोंदणी क्र. बीओएम/डब्ल्युआर/एचएसजी/टीसी/३४८० दि. २०.०७.१९८८ अंतर्गत महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज अॅक्टच्या तरतुदींन्वये एक नोंदणीकृत सोसायटी जिच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता आहे प्लॉट क्र. ४०, गोखले रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०० ०६७ (सदर सोसायटी) चे हक्क तपासत आहोत.

सदर सोसायटीने आमच्या अशिलांना कळवले आहे की, ते खाली वर्णन केलेल्या मिळकतीचे निर्विवाद मालक आहेत. सोसायटीने अर्ज क्र. ३४ सन २०१३ असलेला महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅटस् (रेग्युलेशन ऑफ दी प्रमोशन ऑफ कन्स्ट्रक्शन, सेल, मॅनेजमेंट, अॅण्ड ट्रान्स्फर) अॅक्ट, १९६३ च्या कलम ११(३) अन्वये मानीव अभिहस्तांतरण मंजूर होण्याकरिता सक्षम प्राधिकरणासमोर एक अर्ज केला आहे आणि सक्षम प्राधिकरणाची अशी खात्री झाल्याने की, सदर मिळकतीच्या अभिहस्तांतरणासाठी सोसायटी हक्कदार आहे, त्यांनी क्र. डीडीआर-४/एमयुएम/मानीव अभिहस्तांतरण कांदिवली रिद्धी हाऊसिंग/१३/४२४ धारक दि. २३.०४.२०१३ च्या त्यांच्या आदेश नि प्रमाणपत्रा अंतर्गत सोसायटीच्या नावे सदर मिळकतीचे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण मंजूर केले व संबंधित हस्तांतरणाच्या दुय्यम निबंधकांकडे ते नोंदणीकृत करण्यास मंजुरी दिली. त्यानुसार, सक्षम प्राधिकरणाने सदर सोसायटीच्या नावे दि. १६.०८.२०१३ चा अभिहस्तांतरण विलेख देखील केला. अनु. क्र. बीआरएल-२/६१४०/२०१३ अंतर्गत १६.०८.२०१३ रोजी हस्तांतरणाचे दुय्यम निबंधक, बोरिवली-२, मुंबई यांच्याकडे दि. १६.०८.२०१३ चा सदर अभिहस्तांतरण विलेख रितसर नोंदवला आहे.

सदर सोसायटीने आमच्या अशिलांना कळवले आहे की, एका भागाचे 'मालक/सोसायटी' म्हणून त्यात उल्लेख केलेली येथील सोसायटी आणि अन्य भागाचे 'विकासक' म्हणून त्यात उल्लेख केलेले मे. मान हाऊसिंग डेव्हलपमेंट यांनी केलेल्या त्यांच्यातील दि. १६.०८.२०१३ च्या विकास करारान्वये त्यामधील सोसायटीने दि. १६.०८.२०१३ च्या सदर विकास करारात वर्णन केलेल्या अटी आणि शर्तींवर व वैध मोबदल्यासाठी सदर मिळकतीच्या संबंधातील विकास अधिकार विकासकांना बहाल केले. अनु. क्र. बीआरएल-२-६१४१-२०१३ अंतर्गत १६.०८.२०१३ रोजी हस्तांतरणाच्या दुय्यम निबंधकांच्या कार्यालयात दि. १६.०८.२०१३ चा सदर विकास करार रितसर नोंदवला आहे.

सदर सोसायटीने आमच्या अशिलांना कळवले आहे की, दि. १६.०८.२०१३ च्या सदर विकास करारानुसार येथील सोसायटीने सदर मिळकतीच्या विकासाच्या संबंधात सदर मे. मान हाऊसिंग डेव्हलपमेंटच्या नावे दि. १६.०८.२०१३ चे कुळमुखत्यारपत्र देखील केले; दि. १६.०८.२०१३ चे सदर कुळमुखत्यारपत्र अनु. क्र. बीआरएल-२-६१४२-२०१३ अंतर्गत १६.०८.२०१३ रोजी हस्तांतरणाच्या दुय्यम निबंधकांच्या कार्यालयात रितसर नोंदवले आहे.

सदर सोसायटीने आमच्या अशिलांना कळवले की, आम्ही दि. २०.०६.२०१६, १६.०८.२०१६ व १६.०९.२०१६ रोजीच्या सूचना पाठवल्या आणि अनु. क्र. बीआरएल-२-६१४१-२०१३ अंतर्गत १६.०८.२०१३ रोजी हस्तांतरणाच्या दुय्यम निबंधकांच्या कार्यालयात रितसर नोंदणी केलेला सदर विकासकांशी केलेला दि. १६.०८.२०१३ चा विकास करार आणि अनु. क्र. बीआरएल-२-६१४२-२०१३ अंतर्गत १६.०८.२०१३ रोजी हस्तांतरणाच्या दुय्यम निबंधकांच्या कार्यालयात रितसर नोंदणी केलेले दि. १६.०८.२०१३ चे कुळमुखत्यारपत्र संपुष्टात आणले.

सदर सोसायटीने आमच्या अशिलांना कळवले की, सदर सोसायटीने दि. १९.०९.२०१६ ची एक सूचना डे.ची. इजि. बी.पी. (डब्ल्युएस) II यांच्याकडेही पाठवली व त्याद्वारे त्यांना त्यांच्या कार्यालयात पडून असलेल्या फाईल क्र. सीएचई/डब्ल्युई-II/०८४०/आर २/३३७ वर कार्यवाही न करण्याची आणि सदर सोसायटीच्या पुनर्विकासाशी संबंधित सदर मे. मान हाऊसिंग डेव्हलपमेंट यांना पुढे कोणतीही परवानगी मंजूर न करण्याची विनंती केली. सदर सोसायटीने पंडित अॅण्ड असोसिएटस्चे पीएमसी श्री. चारुदत्त पंडित यांना दि. १९.०९.२०१६ ची एक सूचना देखील पाठवली त्याद्वारे, त्यांना सदर विकासक मे. मान हाऊसिंग डेव्हलपमेंटकडून कोणतीही विनंती/सूचना प्राप्त झाली तर सोसायटीच्या इमारतीच्या पुनर्विकासाशी संबंधित कोणतीही कार्यवाही न करण्याबद्दल विनंती केली आणि सोसायटीने एमजीजीएमच्यासमोर सोसायटीचे प्रतिनिधीत्व न करण्याची देखील विनंती केली.

सदर सोसायटीने आमच्या अशिलांना कळवले आहे की, सदर सोसायटीच्या विकास अधिकारांच्या मंजुरीसाठी दि. १६.०८.२०१३ चा विकास करार आणि दि. १६.०८.२०१३ चे कुळमुखत्यारपत्र संपुष्टात आणण्यासाठी सोसायटीने १९.०९.२०१६ रोजी इंग्रजीत फ्री प्रेस जर्नलमध्ये आणि मराठीत नवशक्ति ह्या दोन वर्तमानपत्रांत जाहीर सूचना प्रकाशित केली. विकासकांना माहिती आहे की, मान हाऊसिंग डेव्हलपमेंटशी सोसायटीने केलेला विकास करार कायद्यानुसार रितसर संपुष्टात आणला आहे.

सदर सोसायटीने आमच्या अशिलांना कळवले आहे की, एका भागाचे 'मालक/सोसायटी' म्हणून त्यात उल्लेख केलेली कांदिवली रिद्धी को- ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. आणि अन्य भागाचे 'विकासक' म्हणून त्यात उल्लेख केलेले मे. सप्रिया डेव्हलपर्स यांनी केलेल्या व त्यांच्यातील दि. ०९.०३.२०१७ च्या विकास कराराने त्यातील सोसायटीने दि. ०९.०३.२०१७ च्या सदर विकास करारामध्ये दिलेल्या अटी आणि शर्तींवर आणि वैध मोबदल्यासाठी परिशिष्टात वर्णन केलेल्या सदर मिळकतीच्या संबंधातील विकास अधिकार विकासकांना मंजूर केले. अनु. क्र. बीडीएल-७-१३३२-२०१७ अंतर्गत २०.०३.२०१७ रोजी दुय्यम हस्तांतरण निबंधक, बोरिवली-तालुका, बोरिवली, मुंबई यांचेकडे दि. ०९.०३.२०१७ चा सदर विकास करार रितसर नोंदवला आहे.

दि. ०९.०३.२०१७ च्या सदर विकास करारानुसार, त्यातील सोसायटीने सदर मिळकतीच्या विकासाशी संबंधित सदर **मे. सप्रिया डेव्हलपर्स** च्या नावे दि. २०.०३.२०१७ चे कुळमुखत्यारपत्र देखील केले. अनु. क्र. बीआरएल-७-१३३३-२०१७ अंतर्गत २०.०३.२०१७ रोजी हस्तांतरणाच्या दुय्यम निबंधकांच्या कार्यालयात दि. २०.०३.२०१७ चे सदर कुळमुखत्यारपत्र रितसर नोंदवले आहे.

आणि म्हणून कोणत्याही व्यक्तीचा खाली वर्णन केलेली मिळकत किंवा तिच्या कोणत्याही हिश्श्यात कोणताही हिस्सा, अधिकार, हक्क, हितसंबंध असल्यास किंवा कोणताही करार, विक्री, गहाण, धारणाधिकार, भार, दान, भाडेपट्टा, पोट-पट्टा, अदलाबदल, सुविधाधिकार, प्रतिबंधक किंवा अन्य करार किंवा अटी, बोजा किंवा अन्य प्रकारे सदर मिळकतीच्या विकासास बाधा आणणारा कोणताही दावा असल्यास, त्यांनी तसे लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना ह्या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांत पुष्ठ्यर्थ पुराव्यांसह कळवणे आवश्यक आहे. १४ दिवसांत जर कोणतेही दावे किंवा आक्षेप प्राप्त झाले नाहीत किंवा त्यानंतर प्राप्त झाले तर, असे दावे किंवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत आणि ते सोडून दिल्याचे किंवा त्यागल्याचे समजण्यात येईल आणि आमच्याकडून आवश्यक हक्क प्रमाणपत्र जारी केले जाईल.

वरील मिळकती संबंधातील परिशिष्ट

गोखले रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे स्थित एकूण सुमारे ४३५५.९६ चौ. फूट कार्पेट एरिया मोजमापित १२ निवासी फ्लॅटस् असलेल्या तळ+०३ वरील मजल्यांचा समावेश असलेल्या कांदिवली रिद्धी को- ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. च्या मालकीच्या 'रिद्धी' नावाच्या त्यावर उभ्या इमारतीसह एकत्रित गाव-कांदिवली, तालुका-बोरिवली जिल्हा-मुंबई उपनगरच्या प्लॉट क्र. ४०, सीटीएस क्र. ९६७, ९६७/१ ते २ धारक सुमारे ४७२.५ चौ. मी. मोजमापित तो सर्व अखंड जमिनीचा प्लॉट.

दिनांक : २ एप्रिल, २०१७.

सही/-
किर्ती नागदा अॅण्ड असोसिएटस्
वकील उच्च न्यायालय
५, त्रिमूर्ती कृपा सीएचएस लि.,
टिळक मंदिर रोड, मालवीय रोड
पोस्ट ऑफिसमागे, विलेपार्ले (पूर्व),
मुंबई-४०००५७.

शिवरायांना खरी आदरांजली वाहायची असेल तर मंत्रिमंडळातून बाहेर पडा!

विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील यांचे उद्धव ठाकरेंना आवाहन

इंदापूर, दि. ३ (प्रतिनिधी) - शेतकरी कर्जमाफीसाठी मंत्र्यांचे राजीनामे देण्याची वल्गना करणारी शिवसेना आता सरकारबाहेर पडण्याऐवजी खाद्देपालट का करते आहे? शेतकऱ्यांचा विश्वासघात करणाऱ्या या घुमजावासाठी शिवसेनेला नेमका काय मलिदा मिळाला, असा सवाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज केला.

संघर्ष यात्रेच्या सहाव्या दिवशी आज पंढरपूर आणि इंदापूर येथील जाहीर सभांमध्ये ते बोलत होते. याप्रसंगी त्यांनी भाजप आणि शिवसेनेच्या सरकारवर जोरदार तोफ डागली. शिवसेनेवर हल्लाबोल करताना विखे पाटील म्हणाले की, शिवसेनेने आजवर शिवरायांच्या नावावर राजकारण केले. आज त्याच छत्रपती शिवाजी महाराजांची पुण्यतिथी आहे. शेतकरी कर्जमाफीबाबत शिवसेनेची भूमिका प्रामाणिक असेल तर त्यांनी आजच्या आज शिवरायांना खरी आदरांजली वाहण्यासाठी सरकारमधून बाहेर पडावे आणि विरोधी पक्षांच्या संघर्ष यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन विखे पाटील यांनी उद्धव ठाकरेंना केले.

शेतकऱ्यांबाबत भाजपच्या दुटप्पी धोरणांचा समाचार घेताना ते म्हणाले की, निवडणुकीच्या प्रचारामध्ये भारतीय जनता पक्षाने अनेक आश्वासने दिली. परंतु सरकारमध्ये आल्यानंतर भारतीय जनता पक्ष आपली आश्वासने पाळायला तयार नाही. केवळ इव्हेंट करुन वेळकाढूपणाचे धोरण स्विकारले गेले आहे. या सरकारला शेतकऱ्यांची अजिबात कणव नसून त्यामुळेच कर्जमाफीसाठी टाळाटाळ सुरु आहे, असा आरोप त्यांनी केला.

स्टेट बँक ऑफ इंडिया

(एसएआरबी) स्ट्रेस्ड अॅसेटस् रिकव्हरी ब्रांच
६ वा मजला, ''दि इंटरनॅशनल'', १६, महर्षी कर्वे रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.
फोन : ०२२-२२०५३१६३/६४/६५ :: **ईमेल-** sarc.mumbai@sbi.co.in

सूचनेचे प्रकाशन
सरफैसी अॅक्ट, २००२ च्या १३(४) कलमान्वये मिळकतीच्या कब्जासंदर्भात

सूचना याद्वारे देण्यात येते की, सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (५४ सन २००२) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ९ सहवाचता कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून सदरहू सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत रक्कम अदा करण्यासाठी त्यांना बोलाविण्यासाठी यानंतर नमूद आणि प्रत्येक खात्यासमोर नमूद तारखेची मागणी सूचना जारी करण्यात आली होती.

सदरहू कर्जदारांनी रक्कम अदा करण्यास कसूर केलेली आहे म्हणून कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी नमूद केलेल्या तारखेस सदरहू अधिनियमाच्या नियम ९ सहवाचता सदरहू अधिनियमाच्या कलम १३(४) अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा घेतलेला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा कोणताही व्यवहार हा रक्कम आणि त्यावरील व्याजाकरिता **स्टेट बँक ऑफ इंडियाच्या** प्रभाराच्या अधीन राहील.

कर्जदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीच्या मालकांचे नाव	गहाण/ प्रभारित मिळकतीचे वर्णन	मागणी सूचनेची तारीख	कब्जाची तारीख	मागणी सूचना तारखेस थकबाकी रक्कम
मे. सुर्यवंशी ऑर्गनायझेशन प्रोप्रा. श्री. जोगिंदर सिंग मागू	**१. श्री. जोगिंदर सिंग मागू** **२. सौ. भारती जे. मागू**	मुंबई शहर आणि मुंबई उपनगरच्या नोंदणी उपजिल्ह्यातील गाव वढवली येथे असलेल्या सर्व्हे क्र. ६७ ते ६९, ७१, ७३, ७७ ए, ७७ बी, ७७ डी आणि ७८ धारक मोजमापित साधारण २६० चौरस यार्डस् २१७.४ चौ. मीटर्सशी समतुल्य घाटकोपर माहुल रोड, तालुका कुर्ला, चेंबूर (पू.), मुंबई-४०० ०७४ चा सी.टी.एस. क्र. ४२५ क्र. ३१-ए, कलेक्टर्स कॉलनी धारक अर्ध विभक्त घराचे सर्व ते भाग आणि विभाग.	३०.०६.२०१२	०१.०४.२०१७	रु. ८,७६,४५,३७२/-

सही/-
प्राधिकृत अधिकारी
(एसएआरबी) स्ट्रेस्ड अॅसेटस् रिकव्हरी ब्रांच

दिनांक : ०१.०४.२०१७
ठिकाण : मुंबई

TRENT
LIMITED
A TATA ENTERPRISE

ट्रेंट लिमिटेड (पूर्वीची लॅक्मे लि.)

कॉर्पोरेट आयडेन्टीटी क्र. (सीआयएन) एल२४२४० एमएच१९५२ पीएलसी००८९५१
नोंदणीकृत कार्यालय : बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई-४००००१.
फोन (९१-२२) ६७०० ९०००, ईमेल : investor.relations@trent-tata.com
वेबसाईट : www.mywestside.com

सूचना

विषय : इन्व्हेस्टर एज्युकेशन अॅण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) अॅथॉरिटीच्या डिमॅट खात्यामध्ये समभागांचे हस्तांतर.

सदर सूचना ही निगम व्यवहार मंत्रालयाद्वारे अधिसूचित आणि त्यानंतर २८ फेब्रुवारी, २०१७ रोजी सुधारित अधिसूचना इन्व्हेस्टर एज्युकेशन अॅण्ड प्रोटेक्शन फंड अॅथॉरिटी (अकाऊंटिंग ऑडिट, ट्रान्सफर अॅण्ड रिफंड) रूल्स २०१६ (**''रूल्स''**) सहवाचता कंपनी अधिनियम २०१३ च्या प्रयोज्य तरतुदीनुसार प्रकाशित करण्यात येत आहे.

रूल्समध्ये इतर बाबीमध्ये आयईपीएफ अॅथॉरिटीच्या डिमॅट खात्यामध्ये सात क्रमवार वर्षे किंवा अधिक करिता रोकड न केलेला किंवा दावारहित लाभांश हस्तांतर करण्याच्या तरतुदीचा समावेश आहे.

कंपनीने योग्य कार्यवाही करण्यासाठी रूल्स अंतर्गत आयईपीएफच्या डिमॅट खात्यामध्ये शेअर्स हस्तांतर होण्याचा संभव असलेल्या संबंधित भागधारकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर रजिस्टर पोस्टाद्वारे ३१ मार्च, २०१७ रोजी वैयक्तिक पत्रव्यवहार पाठविला आहे. कंपनीने तिची वेबसाईट www.mywestside.com वर आयईपीएफ अॅथॉरिटीच्या डिमॅट खात्यामध्ये हस्तांतर होण्यासाठी नियत शेअर्सच्या संबंधित भागधारकांचा संपूर्ण तपशील अपलोड केला आहे. भागधारकांना वरील सदर नुसार हस्तांतर होण्याचा संभव असलेल्या शेअर्सचा तपशील पडताळणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.

कंपनीला ३१ मे, २०१७ पर्यंत संबंधित भागधारकांकडून वैध दावा प्राप्त न झाल्यास कंपनी आयईपीएफच्या डिमॅट खात्यामध्ये इक्विटी शेअर्स हस्तांतर करण्याची कार्यवाही करेल.

भागधारकांनी नोंद घ्यावी की, काही असल्यास अशा शेअर्सवरील उपार्जित सर्व लाभांसह आयईपीएफकडे हस्तांतरित दावारहित लाभांश आणि शेअर्स दोन्ही आयईपीएफ अॅथॉरिटीकडे ऑनलाईन विहित प्रपत्र आयईपीएफ-५ मध्ये अर्ज करून आणि नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर कंपनीकडे प्रपत्र आयईपीएफ-५ मध्ये समाविष्ट आवश्यक कागदपत्रांसह यथायोग्य सही केलेली (कंपनीकडे नोंदविलेल्या नमुना सहीनुसार) प्रत्यक्ष प्रत पाठवून आयईपीएफ अॅथॉरिटीकडून परत मिळण्यासाठी दावा करू शकतात.

प्रत्यक्ष स्वरुपात शेअर्स धारण केलेले आणि ज्यांचे शेअर्स आयईपीएफकडे हस्तांतरित होण्याचा संभव असलेल्या संबंधित भागधारकांनी नोंद घ्यावी की, कंपनी आयईपीएफ अॅथॉरिटीच्या डिमॅट खात्यामध्ये शेअर्स हस्तांतर करण्यासाठी त्यांनी धारण केलेल्या मूळ शेअर प्रमाणपत्राच्याऐवजी प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करणार आहे. कृपया नोंद घ्यावी की, अशाप्रकारे प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी केल्यानंतर मूळ शेअर प्रमाणपत्र जे त्यांच्या नावे नोंदणीकृत आहे ते रद्द आणि वाटाघाटीयोग्य नसल्याचे मानण्यात येईल.

डिमॅट स्वरुपात धारण केलेले आणि आयईपीएफ अॅथॉरिटीकडे हस्तांतरित होण्याचा संभव असलेल्या शेअर्सच्या बाबतीत कंपनी आयईपीएफ अॅथॉरिटीच्या डिमॅट खात्यामध्ये हस्तांतरणासाठी निगम कार्यवाहीच्या मार्गाने डिपॉझिटरीना कळवेल.

भागधारकांनी पुढे नोंद घ्यावी की, कंपनीच्या वेबसाईटवर अपलोड केलेला तपशील हा रूलसनुसार आयईपीएफच्या डिमॅट खात्यामध्ये शेअर्स हस्तांतरण करण्यासाठी कंपनीद्वारे प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करण्याच्या संदर्भातील पुरेशी सूचना आणि संदर्भ मानण्यात यावा. कृपया नोंद घ्यावी की, आयईपीएफकडे हस्तांतरित शेअर्स आणि दावारहित लाभांश रकमेच्या संदर्भात कंपनीच्या विरोधात दावा करता येणार नाही.

भागधारकांना सापेक्ष बाबीवर कोणतीही चौकशी करायची असल्यास ते कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट, टीएसआर दाराशॉ लिमिटेड, युनिट : ट्रेंट लिमिटेड, ६-१० हाजी मूसा पत्रावाला इंडस्ट्रियल इस्टेट, २०, डॉ. ई. मोझेस रोड, महालक्ष्मी, मुंबई-४०००११, फोन : +९१-२२-६६५६८४८४, फॅक्स : + ९१-२२-६६५६८४९४, वेबसाईट : www.tsrdarashaw.com, ई-मेल आयडी : csg-unit@tsrdarashaw.com यांना संपर्क करू शकतात.

ट्रेंट लिमिटेडकरिता
सही/-
एम. एम. सुरती
कंपनी सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३ एप्रिल, २०१७.